दिव्यांग कार्यशाळा/ कर्मशाळा यांच्या नावामध्ये कौशल्य विकास केंद्र अशी सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**दिव्यांग कल्याण विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक:- दिव्यांग-२०२५/प्र.क्र.१९/दिव्यांग कल्याण/कार्या-४**

३१,३२,३५ ए, मित्तल टॉवर, ए-विंग,तिसरा मजला,
बॅरीस्टर रजनी पटेल मार्ग, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**दिनांक: - १३ जानेवारी, २०२६**

**वाचा :-**

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय क्र.ईडीडी-२०१८/प्र.क्र.२८८/ अ.क.१, दि.१८ जुलै, २०१८.
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय क्र.अपंग-२०१३/प्र.क्र.२०१/ अ.क.२, दि.२० फेब्रुवारी, २०१९.
३. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६, दि.२७ डिसेंबर,२०१६.

**प्रस्तावना :-**

दिव्यांग व्यक्तींसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे हा दिव्यांग व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबासाठी जीवनमान उंचावण्याचा एक महत्त्वाचा घटक आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील प्रकरण-३ अन्वये व्यावसायिक प्रशिक्षण व स्वरोजगार यावर लक्ष्य केंद्रीत करते. दिव्यांग व्यक्तींना रोजगार उपलब्ध करणे करिता त्यांना व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. याकरिता केंद्र शासनाने “कौशल्य प्रशिक्षण” देणाऱ्या संस्थांच्या सहकार्याने व्यावसायिक प्रशिक्षण व नोकरी करिता सहाय्य केले जाते. याकरिता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयान्वये दिनांक १८ जुलै, २०१८ दिव्यांगांच्या विशेष शाळा, कर्मशाळा प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतीगृह, मतिमंद बालगृह, शिघ्र निदान व शिघ्र उपचार केंद्राकरीता सुधारीत विशेष शाळा संहिता लागू करण्यात आली आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी चालविण्यात येणाऱ्या कार्यशाळांचा मुख्य उद्देश त्यांना स्वावलंबी बनविणे, रोजगारश्रम बनविणे आहे. सद्यस्थितीत या संस्थांना “दिव्यांगांच्या कार्यशाळा” असे संबोधले जाते. या संस्थांची सकारात्मकता वाढविण्याच्या अनुषंगाने विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत प्रशिक्षण केंद्रे तथा कार्यशाळा/कर्मशाळा यांच्या नावामध्ये **“कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र”** अशी सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

केंद्र सरकारच्या "कौशल्य भारत अभियान" (Skill India Mission) व इतर धोरणांमध्ये दिव्यांगांची "कौशल्यवृद्धी" करून त्यांना रोजगार व स्वयंरोजगारक्षम बनविणे हे अधोरेखित केलेले आहे. केवळ प्रशिक्षण देणे नव्हे, तर रोजगारक्षम कौशल्य विकसित करणे हा "कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र "यांचा मूळ उद्देश स्पष्ट

होतो. "कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र" हे नाव दिव्यांगजनांच्या क्षमता, आत्मनिर्भरता आणि सक्षमीकरण यावर लक्ष केंद्रित करत, जे समाजाच्या समावेशी आणि सशक्तिकरणाच्या दृष्टिकोनाशी अनुरूप आहे. "कौशल्य विकास केंद्र" ही संज्ञा अधिक सकारात्मक, सशक्त आणि प्रेरणादायी आहे.

केंद्र शासनाच्या २०१६ च्या कायद्यातील निदेशाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने "महाराष्ट्र अपंगांच्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र संहिता, २०१८ मधील "कौशल्य विकास" या संज्ञेची व्याप्ती अधिक व्यापक करणेकरिता प्रशिक्षण केंद्राच्या व्याख्येमध्ये नमुद "दिव्यांग व्यक्तींच्या कर्मशाळा, संरक्षित कर्मशाळा तत्सम उपक्रम" तसेच महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण, २०१८ मध्ये नमुद कार्यशाळा व विशेष कार्यशाळा इ. उपक्रमांना तसेच प्रशिक्षण केंद्रांना एकत्रितपणे "कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र" संबोधणे संयुक्तिक ठरेल.

सबब, विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत प्रशिक्षण केंद्रे तथा कार्यशाळा/कर्मशाळा यांच्या नावामध्ये "कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र" अशी सुधारणा करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०११३१७०७०१९३३५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VINAYAK VITTHAL BASWANT

Digitally signed by VINAYAK VITTHAL BASWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PDWD, 2.5.4.20=62D025A754CF3ECC70465F283084AEAA9CD2CFA4897A30280B6C15268692DDEE, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=03F3D0B523A2679F286EDB717AAF568830E95BDB41FD2E6EFCD98776B6837069, cn=VINAYAK VITTHAL BASWANT
Date: 2026.01.13 17:08:12 +05'30'

**(विनायक बसवंत)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१.मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. सर्व मंत्री / राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. मा. मुख्य सचिव यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

७. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,

८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अमुस/प्र.स./सचिव,

९. आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

१०. संचालक, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे,

११. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, मुंबई

१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ,

१३. सर्व जिल्हाधिकारी,

१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

१५. सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,

१६. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी,

१७. सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
१८. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर
१९. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
२०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२१. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई १५ प्रती प्रसिध्दीसाठी)
२३. सर्व कार्यासने, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
२६. निवड नस्ती, कार्या-४